आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
७ फेब्रुवारी २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी ५२ टक्के मतदान

- मुंबईच्या महापौरपदासाठी भाजपाच्या रितू तावडे आणि उपमहापौरपदासाठी शिवसेनेचे संजय घाडी यांचे अर्ज दाखल

- गडचिरोली जिल्ह्यात सुरक्षादलांच्या कारवाईत ७ नक्षली ठार

**आणि**

- टी-२० क्रिकेट विश्व चषक स्पर्धेत भारताविरुद्धच्या सामन्यात अमेरिकेचा नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय

<><><><><>

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्याच्या निवडणुकीसाठी मतदान आज शांततेत पार पडलं.

**राज्यात** आज दुपारी साडे तीन वाजेपर्यंत सुमारे **५२ पूर्णांक २** दशांश टक्के मतदान झालं.

**सिंधुदुर्गमधे** दुपारी साडे तीन वाजेपर्यंत ५० पूर्णांक १० शतांश टक्के इतकं मतदान झालं.

**धाराशिव** जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या ५५ गटांसाठी आणि पंचायत समितीच्या आठ तालुक्यातील ११० गणांसाठी ५० टक्के मतदान झालं.

**सांगली** जिल्हा परिषदेच्या ६१ गट आणि पंचायत समितीच्या १२२ गणासाठी ५१ पूर्णांक ४७ शतांश टक्के मतदान झालं. जिल्ह्यात सर्वाधिक मतदान वाळवा तालुक्यात तर सर्वांत कमी कवठेमहांकाळ तालुक्यात झालं.

**सोलापूर** जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी ४७ पूर्णांक ६६ शतांश टक्के

**सातारा** जिल्हा परीषद आणि ११ पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी ५१टक्के

**परभणी** जिल्ह्यात ५५ पूर्णांक ७१ शतांश टक्के मतदान झालं. परभणी जिल्ह्यात पाथरी इथं गुलशन नगर मतदान केंद्रावर किरकोळ कारणावरून काँग्रेस आणि शिवसेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची झाली.

**लातूर** जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी ५० टक्के मतदान झालं.
**रत्नागिरीत** ४७ पूर्णांक ३८ शतांश टक्के
**कोल्हापूर** जिल्ह्यात ५८ पूर्णांक ८१ शतांश टक्के
**पुण्यात** ५१ टक्के तर **छत्रपती संभाजीनगर** जिल्ह्यात ५१ पूर्णांक ५२ शतांश आणि **रायगड** जिल्ह्यात ५७ पूर्णांक ७७ शतांश टक्के मतदान झालं.

**<><><><><>**

राज्यात विविध जिल्ह्यांत झालेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकात मान्यवरांनीही आपला मतदानाचा हक्क बजावला.
उपमुख्यमंत्री **सुनेत्रा पवार** यांनी बारामतीमधल्या काटेवाडी इथं मतदानाचा हक्क बजावला. **लोकशाहीच्या या महत्त्वपूर्ण प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेऊन नागरिकांनी मतदान करावं असं आवाहन त्यांनी केलं.**
मंत्री **दत्तात्रय भरणे** यांनी इंदापूर तालुक्यात भरणेवाडी इथं तर मंत्री **बाबासाहेब पाटील** यांनी लातूर जिल्ह्यातल्या शिरूर ताजबंद इथं, मंत्री **नितेश राणे** यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यात वरवडे इथं मतदान केलं.
राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते **रोहित पवार** यांनी बारामती इथं मतदान केलं. आमदार **अमित देशमुख** आणि **धीरज देशमुख** यांनी बाभळगाव इथं मतदानाचा हक्क बजावला. आमदार **संभाजी पाटील निलंगेकर** यांनी औराद शहाजनी इथं, आमदार **अभिमन्यू पवार** यांनी कासार शिरशी इथं, आमदार **संजय बनसोडे** यांनी मलकापूर इथं मतदान केलं.
खासदार **विशाल पाटील** यांनी सांगली जिल्ह्यातल्या पदमाळे गावात तर माजी मंत्री **हर्षवर्धन पाटील** यांनी पुणे जिल्ह्यात बावडा इथं मतदानाचा हक्क बजावला. मंत्री **उदय सामंत** यांनी रत्नागिरी तालुक्यात पाली इथं तर
खासदार **ओम राजेनिंबाळकर** यांनी धाराशिव तालुक्यात गोवर्धन वाडी इथं मतदानाचा हक्क बजावला. आमदार **मेघना बोर्डीकर** यांनी परभणी जिल्ह्यात बोर्डी इथं मतदान केलं.

**<><><><><>**

मुंबई महानगरपालिकेच्या महापौर पदासाठी भारतीय जनता पार्टीच्या रितू तावडे, उपमहापौर पदासाठी शिवसेनेचे संजय घाडी यांनी आज उमेदवारी अर्ज भरले. मुंबई- भाजप अध्यक्ष अमित साटम यांनी रितू तावडे यांच्या, तर शिवसेना नेते राहुल शेवाळे यांनी संजय

घाडी यांच्या नावाची घोषणा केली. उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस होता. मुंबई महानगरपालिकेत भाजपा आणि शिवसेना महायुतीला अधिक जागा असल्याने या उमेदवारांची निवड निश्चित मानली जात आहे. शिवसेनेचे संजय घाडी १५ महिने उपमहापौर म्हणून काम करतील, शिवसेना आपल्या चार नगरसेवकांना उपमहापौर पदाचा कार्यकाळ विभागून देणार असल्याचं शिवसेना सचिव संजय मोरे यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

मालेगाव महानगरपालिकेच्या महापौरपदी इंडीयन सेक्युलर लार्जेस्ट असेंब्ली ऑफ महाराष्ट्र - इस्लाम पार्टीच्या शेख नसरीन खालिद यांची तर उपमहापौरपदी समाजवादी पार्टीच्या शान ए हिंद निहाल अहमद यांची निवड झाली. या दोघींनाही प्रत्येकी ४३ मतं मिळाली. त्यांचे प्रतिस्पर्धी शिवसेनेच्या लता घोडके आणि निलेश काकडे यांना प्रत्येकी १८ मतं मिळाली. एआयएमआयएम आणि भाजपाचे नगरसेवक या निवडणुकीत तटस्थ राहिले.

नांदेड महानगरपालिकेत आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रीया पूर्ण झाली. इथे भाजपा - शिवसेना युती, काँग्रेस - वंचित बहुजन आघाडी आणि एम आय एम अशी तिरंगी लढत होणार आहे. निवडणुकीसाठी येत्या मंगळवारी महानगरपालिकेत विशेष सभा होईल.

<><><><><>

भविष्यात महाराष्ट्राचा भर धोरण आधारित विकासावर राहील, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. नागपूरमध्ये सुरू असलेल्या ऍडव्हान्टेज विदर्भ-खासदार औद्योगिक महोत्सवामध्ये आयोजित आंतराष्ट्रीय व्यापार परिषदेच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. राज्य सरकारनं अनेक धोरणं आखली असून भविष्यातील गरजा, बदल आणि आव्हानं लक्षात घेऊन येत्या दोन-तीन महिन्यात विविध क्षेत्रांत भविष्यासाठी धोरणं आणली जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

या महोत्सवात आज सुमारे १० हजार ८३१ कोटी रुपयांचे सामंजस्य करार झाल्याची माहिती मुख्यमंत्र्यांच्या आर्थिक सल्लागारांनी दिली आहे.

<><><><><>

सहकारातून समृद्धी हे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं स्वप्न साकार करण्यासाठी विद्यार्थ्यांनी संपूर्ण कार्यक्षमतेनं सहकार क्षेत्रात काम करावं, असं आवाहन केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केलं. ते आज पुण्यात वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध

संस्थेत कृषी-व्यवसाय व्यवस्थापन पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या ३१व्या दीक्षांत समारंभात बोलत होते. देशातल्या सहकार क्षेत्रातल्या विश्वविद्यालयाचा उल्लेख त्यांनी यावेळी केला.

**- - बाईट - - मुरलीधर मोहोळ - -**

विद्यार्थ्यांनी सहकारी संस्थांमध्ये व्यावसायिकता आणि आधुनिक व्यवस्थापन कौशल्यं आणली पाहिजेत असं मोहोळ म्हणाले. सहकार क्षेत्रात पारदर्शकता आणण्यासाठी तसंच कार्यक्षमता वाढवण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा अवलंब केला पाहिजे असंही त्यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यात महाराष्ट्र आणि छत्तीसगड सीमेवर सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत सात नक्षली मारले गेले असून या भागात आता केवळ सात नक्षली शिल्लक राहिल्याचं पोलीस अधीक्षक निलोत्पल यांनी आज वार्ताहरांना सांगितलं. या परिसरात तीन दिवस शोधमोहीम सुरू होती, यावेळी सुरक्षा दलांबरोबर नक्षलींची चकमक झाली, यात नक्षलींच्या कंपनी क्रमांक दहा चा प्रमुख प्रभाकर आणि कंपनी क्रमांक पाच चा कमांडर पागु मोड्याम यांच्यासह सात जण मारले गेले. या सात जणांवर मिळून दोनशे गुन्हे दाखल होते, तसंच ७१ लाख रुपयांचं बक्षीस होतं.

३१ मार्चपर्यंत गडचिरोली जिल्हा नक्षलमुक्त होईल, असा विश्वास निलोत्पल यांनी व्यक्त केला आहे. शिल्लक राहिलेल्या नक्षलींपैकी दोन जण गडचिरोलीमधे असून पाच जण छत्तीसगड राज्यात वास्तव्याला असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मराठवाडा साहित्य परिषदेचा ‘कविवर्य कुसुमाग्रज काव्यपुरस्कार’ ज्येष्ठ कवी लक्ष्मीकांत तांबोळी यांना आणि 'कवयित्री लीला धनपलवार काव्यपुरस्कार' कवयित्री योगिनी सातारकर-पांडे यांना जाहीर झाला आहे. रोख ११ हजार रुपये आणि सन्मानचिन्ह असं पुरस्काराचं स्वरूप आहे. येत्या २७ फेब्रुवारीला कविता दिनानिमित्त नांदेड इथं आयोजित कार्यक्रमात हे पुरस्कार प्रदान केले जातील, अशी माहिती 'मसाप'चे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील यांनी दिली आहे.

**<><><><><>**

क्रिकेट टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेला आजपासून सुरुवात झाली. स्पर्धेचा तिसरा सामना भारत आणि अमेरिका यांच्यामध्ये मुंबईतल्या वानखेडे स्टेडियमवर आता खेळला जात आहे. या सामन्यात अमेरिकेच्या संघाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे.

त्याआधी वेस्ट इंडिज विरुद्ध स्कॉटलँड या दुसऱ्या सामन्यात वेस्ट इंडिजने स्कॉटलंडवर ३५ धावांनी विजय मिळवला.

तर स्पर्धेच्या पहिल्या सामन्यात पाकिस्तानने नेदरलँडसवर ३ गडी राखून विजय मिळवला.

//<><><><><>//